# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 21.03.2025** **वार- शुक्रवार**

---

**दत्तक योजना**

पुणे जिल्हा कुपोषणमुक्त करण्यासाठी जिल्हा परिषद ‘दत्तक बालक योजना’ राबवणार आहे. या योजनेंतर्गत सरकारी अधिकाऱ्यांना बालकं दत्तक देऊन त्यांच्या आरोग्याची जबाबदारी सोपवली जाणार आहे. पुणे जिल्ह्यातील सुमारे दोन लाख 80 हजार बालकांची आरोग्य तपासणी केल्यानंतर त्यात 375 बालकं कुपोषित आढळून आली आहेत. आंबेगाव आणि जुन्नर तालुक्यात सर्वाधिक कुपोषित बालकं आढळली आहेत.

**शिधा पत्रिका धारक**

शिधापत्रिकाधारकांना आधार क्रमांक जोडण्यासाठी म्हणजे ई-केवायसीसाठी अन्न आणि नागरी पुरवठा विभागाने 31 मार्चपर्यंतची मुदत दिली आहे. आतापर्यंत पुणे जिल्ह्यातील 66 टक्के शिधापत्रिकाधारकांनी ‘ई-केवायसी’ पूर्ण केली आहे. आता घरबसल्या ‘केवायसी’ पूर्ण करता यावी यासाठी ‘मेरा ई-केवायसी’ ॲप विकसित करण्यात आलं आहे.

**ग्राहक संरक्षण समिती**

पुणे जिल्हा ग्राहक संरक्षण समितीच्या बैठकीत केल्या जाणाऱ्या सूचनांबाबत सर्व संबंधित विभागांनी वेळेत कार्यवाही करून त्या निकाली काढाव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी दिले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीत ते आज बोलत होते.

**चित्रपट महोत्सव**

मराठी चित्रपटांना प्रोत्साहन देण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि मराठी चित्रपट संघटनेनं नाट्यगृहात मराठी चित्रपट महोत्सवाचं आयोजन केलं आहे. येत्या 24 आणि 25 मार्च या दिवशी पिंपरी चिंचवडच्या रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात हा महोत्सव होणार आहे. या महोत्सवात जुन्या चित्रपटांचा रसास्वाद घेता येणार असल्याचं महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी सांगितलं.

**पाणी पुरवठा**

पुणे शहरात समान पाणीपुरवठा योजनेअतंर्गत पाण्याचं मीटर बसवलं जात आहे. या योजनेत आतापर्यंत बसवण्यात आलेल्या 47 पाण्याच्या मीटर विभागांपैकी 11 विभागांमध्ये पाण्याच्या टाकीपासून ते घरापर्यत 10 दशलक्ष लिटर पाण्याची बचत झाली आहे. समान पाणीपुरवठा योजनेत जलवाहिन्यामधील गळती शोधण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. या योजनेमुळे पाण्याची गळती 20 टक्क्यांपेक्षाही कमी केली जाणार आहे, अशी माहिती पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी. यांनी दिली आहे.

**वाहतूक कोंडी**

पुणे शहरातील मध्यवर्ती भागातील वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी शनिवारवाडा ते स्वारगेट आणि सारसबाग ते शनिवारवाडा या दोन महत्त्वाकांक्षी भुयारी मार्गांच्या प्रकल्पांना गती मिळाली आहे. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात पार पडलेल्या उच्चस्तरीय बैठकीत भुयारी मार्गांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या. आमदार हेमंत रासने यांनी आज ही माहिती दिली.

**भाडे करार**

पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात घरात भाडेकरू ठेवताना भाडेकरूचं नाव, सध्याचा पत्ता, मूळ पत्ता, दोन छायाचित्र, त्यांना ओळखणाऱ्या व्यक्तीचं नाव आणि पत्ता, भाडे करारनामा, ओळखपत्र आदींबाबतची कागदपत्र घरमालकांना स्थानिक पोलीस ठाण्याकडे सादर करावे लागणार आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी ज्योती कदम यांनी याबाबत आदेश जारी केले आहेत.

**अमली पदार्थ**

भांगमिश्रीत गोळ्यांची विक्री करणाऱ्या किराणा माल दुकानदाराला पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने अटक केली आहे. शिवणे परिसरात ही कारवाई करण्यात आली. या दुकानदाराकडून चार किलोहून अधिक भांगमिश्रीत गोळ्या जप्त करण्यात आल्या.

**सायक्लोथॉन**

लोहा फाउंडेशननं आयोजित केलेली चौथी “आपले पुणे सायक्लोथॉन” ही स्पर्धा उत्साहात पार पाडली. यामध्ये हजारो सायकलस्वारांसह दिव्यांग आणि अनाथ मुलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या उपक्रमाने समावेशकता आणि सामाजिक ऐक्याचा संदेश दिला. शारीरिकदृष्ट्या दिव्यांग सायकलस्वारांनी ३ किलो मीटर, तर अनाथाश्रमातील मुलांनी 10 किलो मीटर सायकलफेरी पूर्ण केली.

**फुटबॉल**

पुणे जिल्हा फुटबॉल संघटनेतर्फे आयोजित ‘पीडीएफए लीग 2025’ फुटबॉल स्पर्धेच्या अव्वल श्रेणी गटाच्या सामन्यामध्ये अंकित देवी आणि अभिषेक शिंदे यांनी केलेल्या गोलांच्या जोरावर रिअल पुणे युनायटेड एफसी अ संघाने केपी इलेव्हनचा 2-1 असा पराभव केला. द्वितीय श्रेणी गटाच्या साखळी सामन्यामध्ये आर्यन तांबे आणि सार्थक बी यांनी केलेल्या कामगिरीमुळे लिजंड्स युनायटेड एफसीने राहूल फुटबॉल क्लबचा 3-2 असा पराभव केला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 36 अंश सेल्सिअस तर किमान 17 अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्या कमाल तापमानात किंचित घट होण्याचा अंदाज असून दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**